*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. XII / Issue – I* *ISSN 2277-8063*

# 'महात्मा गांधीजीच्या आर्थिक विचारांची वर्तमानकालीन समर्पकता'

**श्री कुबेर दिनकर दिंडे**
M.A. B.Ed. SET. NET.(Economics)
मु.पो.बहिरेश्वर ,ता. करवीर जि. कोल्हापूर मो.७२६३९३७००९
Email- kuberdinde1979@gmail.com

.......................................................................................................................

**सारांश :**महात्मा गांधीजी हे शास्त्रीय दृष्टीकोनातून अर्थशास्त्रज्ञ होते की नाही हा एक चर्चेचा आणि वादविवादाचा विषय होऊ शकेल कारण त्यांनी इतर अर्थशास्त्रज्ञासारखे अर्थशास्त्र या विषयावर ग्रंथ लिहीले नाहीत किंवा काही सिध्दांत किंवा नियम मांडले नाहीत परंतू असे जरी असले तरी आज संपूर्ण जगभरात महात्मा गांधीजीच्या आर्थिक विचारावर जेवढी चर्चा होते , जेवढे परीसंवाद होतात तेवढी चर्चा, तेवढे परिसंवाद क्वचितच एखाद्या अर्थशास्त्रज्ञांच्या आर्थिक विचाराबर होत असतील यातच गांधीजींच्या आर्थिक बिचारांचे महत्व अधोरेखीत होते. भारत स्वतंत्र होऊन आज ७५ वर्षे पूर्ण होत आहेत या ७५ वर्षांच्या भारतीय अर्थव्यवस्थेचे मूल्यमापन केले तर आपल्याला असे दिसून येते की ज्याप्रमाणे एका बाजूला जसा आपल्या देशाचा विकास होत गेला त्याप्रमाणे दुसऱ्या बाजूला दारिद्रय,बेकारी,पर्यावरण ऱ्हास,आर्थिक विषमता,शहरीकरण,प्रदूषण असे आर्थिक प्रश्न निर्माण होत आहेत,या सर्व प्रश्नांची उत्तरे महात्मा गांधीजीच्या आर्थिक विचारांमध्ये आपल्याला दिसून येतात

**प्रस्तावना–** महात्मा गांधी म्हणजेच मोहनदास करमचंद गांधी यांनी १९२० ते १९४७ पर्यंत भारतासाठी ब्रिटिशांच्या विरोधात भारतीय लढयाचे नेतृत्व केले. ते बॅरीस्टर होते. त्याशिवाय त्यांनी स्वत: अनेक ग्रंथांचे वाचन, चिंतन केलेले होते विशेषत: त्यांच्यावर 'हेन्री डेव्हिड थोरो' यांच्या 'सिव्हिल डिसओबिडियन्स', 'लिओ टॉलस्टॉय' 'द किंगडम ऑफ गॉड इज विदीन यू' आणि 'जॉन रस्किन' यांच्या 'अन टू धिस लास्ट' या तीन ग्रंथांचा त्यांच्यावर विशष प्रभाव पडलेला होता. त्यानंतर हिंदू धर्मग्रंथ 'भगवद्‌गीता' हा त्यांच्यासाठी आयुष्यभरासाठी प्रमाणग्रंथ होता. हा ग्रंथ त्यांच्यासाठी फक्त प्रमाणग्रंथच नव्हता तर तो त्यांच्यासाठी जीवनग्रंथ होता. या पार्श्वभूमीमुळे त्यांची स्वत:ची एक नैतिक आणि अध्यात्मिक धारणा तयार झालेली होती आणि याच धारणेतून त्यांनी जीवनातील प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या आर्थिक विचाराला सुद्‌धा एक नैतिक आणि अध्यात्मिक पाया आहे.

महात्मा गांधी यांचे अर्थशास्त्रीय विचार हे त्यांनी वर्तमानपत्रातून केलेले लिखाण, त्यांनी केलेली भाषणे, त्यांनी संपूर्ण आंयुष्यात केलेल्या कृती यांतून व्यक्त होतात. हे सर्व विचार संकलित प्रसिद्‌ध करण्याचे काम गांधीजीचेच अनुयायी जे. सी. कुमारप्पा यांनी केले आणि त्यालाच गांधीजीचे अर्थशास्त्र असे म्हणतात.

**उद्दिष्टे :**

१) गांधीजीच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे

२) देशातील आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे

३)गांधीजीच्या आर्थिक विचारांच्या आधारे देशातील आर्थिक समस्यांच्यावर उपाययोजना सुचवणे.

**गृहीतक:** देशातील सद्यस्थितीत असलेल्या आर्थिक समस्या गांधीजीच्या आर्थिक विचारांच्या आधारे आपल्याला सोडवता येऊ शकतील.

**संशोधन पद्धती :**सदरचा संशोधन लेख लिहिण्यासाठी संशोधकाने दुय्यम सामग्रीचा वापर केलेला आहे.

**महात्मा गांधीजीचे आर्थिक विचार:**

महात्मा गांधीजीनी भारतासाठी कल्याणकारी राज्याच्या निर्मितीसाठी काही महत्वाचे आर्थिक विचार पुढीलप्रमाणे मांडलेले आहेत.

**ग्रामीण विकास:** भारतात खेडयांची संख्या जास्त असल्यामुळे खेडयांचा विकास झाला तरच देशाचा विकास होऊ शकतो हे गांधीजीना माहिती असल्यामुळे त्यांनी ग्रामीण विकासावर फार मोठया प्रमाणावर भर दिला. यासाठी त्यांनी स्वंयपूर्ण खेडी,ग्रामोद्योगाद्वारे ग्रामीण विकास, सर्वोदय,

वर्ग समन्वयाची कल्पना, श्रमप्रधान उद्योगावर भर ,अन्नधान्य आणि लोकसंख्या, ग्रमस्वराज्य,स्वदेशी,पंचायत राज, सहकार या संकल्पना मांडल्या. या सर्व संकल्पना त्यांनी फक्त मांडल्याच नाही तर त्यासाठी त्यांनी वेगवेगळे प्रयोगही राबवले. यामध्ये ग्रामीण उद्योगांची पुनर्रचना आणि उत्पादक व्यवस्थापनाचे विकेंद्रीकरण यावर भर देण्यात आला आहे.

**सत्तेचे विकेंद्रीकरण :**

सर्व प्रकारच्या केंद्रीकरणाला गांधीजींचा तीव्र विरोध होता. भारताच्या कानाकोपऱ्यात वैविध्यपूर्ण जीवन आहे आणि हे लोक आपल्या परिसरांशी व नैसर्गिक संसाधनांशी नाते बांधून राहत आहेत हे त्यांना दिसत होते. ब्रिटिशपूर्वकाळात देशातील प्रत्येक खेडयात सत्तेचे केंद्रीकरण होते आणि ती गावे आपल्या खेडयातील संसाधनांचे व्यवस्थापनही अतिशय उत्तम प्रकारे करत होती परंतू ब्रिटिशकाळात हे गाव–खेडयातील वैभव नष्ट झाले होते अणि गांधीना ते वैभव परत आणावयाचे होते. यासाठी गावांना स्वावलंबी सत्ता देणे त्यांनी इष्ट मानले याला 'पंचायत राज' असे त्यांनी नाव दिले आणि ते आजही वापरात आहे. पंचायत राज पद्धतीतून जनतेचा विचार आणि मत लोकशाहीत उपयुक्त ठरेल असे त्यांनी मानले. भारतातील अर्थव्यवस्थेला अशा प्रकारचे विकेंद्रीशासनच उपयुक्त ठरेल असे ते मानायचे.

**स्थानिक अर्थव्यवस्था:**

महात्मा गांधीजी शहरे आणि औद्योगिक केंद्राच्या पूर्णपणे विरोधात होते. एका शहरात उद्योग वाढण्यापेक्षा खेडयापाडयातून उद्योग पोहोचले पाहिजेत असे ते म्हणत. ग्रामीण जनता उद्योगाकडे खेचली जाऊन शहरात गरिबीत राहण्यापेक्षा उद्योगधंदे ग्रामीण भागात जाऊन तिथले नागरिक स्वाभिमानाने जगावेत असे त्यांचे मत होते त्यासाठी त्यांनी लघू आणि कुटिर उद्योगांना प्राधान्य दिले. लघू उद्योगातून जास्त रोजगार निर्माण होतात, वर्षभर शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबियांना रोजगार मिळतो, वाहतूक खर्च होत नाही, कच्चा माल जिथे उत्पादित केला जातो तिथेच त्याला बाजारपेठ उपलब्ध होते आणि पक्का मालही तिथेच विकला जाऊन वाहतूक खर्च होत नाही तसेच इंधनाचीही बचत होते.यामध्येच त्यांची ग्रामस्वराज्य ही संकल्पना दिसून येते यालाच त्यांनी स्वयंपूर्ण खेडी असे नाव दिले.

**कमित कमी यंत्रांचा वापर:**

महात्मा गांधीजी हे यंत्रविरोधी नव्हते तर ते यंत्रविवेकी होते. जिथे अपरिहार्यता आहे अशा ठिकाणी यंत्राचा वापर करावा पण शक्यतो यंत्राचा वापर कमित कमी करावा कारण यंत्राच्या अतिवापरामुळे माणूस हा यंत्रवत होतो त्याचे जीवन यांत्रिक जीवन होते आणि गांधीना हे नको होते. त्यांचा शरीरश्रमावर भर होतो. प्रगत तंत्र आणि यंत्रसामग्रीतून नोकऱ्या नष्ट होतात आणि कामगारांचा यंत्राशी जिव्हाळा निर्माण होत नाही. अनेकांच्या नोकऱ्या जातात आणि उत्पादनातून निर्माण होणारा पैसा भांडवलदारांच्याकडे जातो आणि समाजात गरिब आणि श्रीमंत असे दोन वर्ग निर्माण होतात.याचे पर्यवसान आर्थिक विषमतेत होते त्यांनी यासाठीच लघू आणि कुटिर उद्योगावर भर दिला होता. लघू आणि कुटिर उद्योगासाठी कमी जागा, कमी भांडवल लागते आणि यातून रोजगार निर्मिती मोठया प्रमाणावर होत असते. 'चरखा' हे त्याचेच एक प्रतिक होते.

**विकासाचे मुलभूत तत्व–स्वदेशी:**

स्वदेशी हा संस्कृत शब्द असून तो दोन शब्दांचा मिळून बनलेला आहे 'स्व' म्हणजे स्वत:चा आणि देशी म्हणजे देश होय. स्वदेशी या शब्दाचा अर्थ म्हणजे आपल्या स्वत:चा देश होय. परंतू व्यावहारीक अर्थाने तो आत्मनिर्भरतेशी संबधित वापरला जातो. महात्मा गांधीजीच्या मते, स्वदेशी म्हणजे देशाची स्वंयपूर्णता होय.स्वदेशी तत्वाच्या अमंलबजावणीमुळे देशांतर्गत उत्पादन व मागणीला महत्व मिळते, यामुळे विदेशी वस्तूंचा त्याग करुन देशी वस्तू वापर करणे परदेशी वस्तूंच्या वापरामुळे भारतातील वस्तूंना मागणी कमी होऊन भारतात दारिद्रय निर्माण होईल असे त्यांना वाटत होते. यातून महात्मा गांधीजीना केवळ सामाजिक आणि धार्मिक क्षमताच अपेक्षित नव्हती तर आर्थिक क्षमतासुद्धा अपेक्षित होती. त्यांच्या मते स्वदेशी ही एक अशी भावना आहे जी दूरवरचे क्षेत्र सोडून आपल्या भागातील, देशातील जवळच्या क्षेत्राचा उपयोग करण्याकरीता व त्यांची सेवा करण्याकरीता उपयोगी पडेल.

| मुद्दे | तत्कालिन अर्थशास्त्र | निर्माण झालेल्या समस्या | या समस्यांवर गांधीजीच्या आर्थिक विचारांच्या आधारे उपाययोजना |
|---|---|---|---|
| तत्वज्ञान | भौतिकवादी, मानवकेंद्रीत | स्वार्थीप्रवृत्ती, भोगवाद | अध्यात्मिक, निसर्गकेंद्रीत,शाश्वत विकास |
| नैसर्गीक संसाधनांचा वापर | कमाल उपयोग | नैसर्गीक संसाधनांचा ऱ्हास,पर्यावरण ऱ्हास | नैसर्गीक संसाधनांचा संयमाने वापर |
| उत्पादन पद्धती | भांडवलप्रधान | बेकारी, दारिद्रय, आर्थिक विषमता | श्रमप्रधान, स्वदेशी , ग्रामस्वराज्य |
| सत्ता | सत्तेचे केंद्रीकरण, भांडवलदारांकडे | गरिब—श्रीमंत वर्ग आर्थिक विषमता | सत्तेचे विकेंद्रीकरण,जनतेकडे |
| विकासाची दिशा | शहरीकरणावर भर | सर्व प्रकारचे प्रदुषण | स्वंयपूर्ण खेडयावर भर |

वरील तक्ता बघता आपल्या लक्षात असे येते की , आजच्या युगात गांधीजीच्या आर्थिक विचारांना पर्याय नाही. या विचारानुसार आज आपल्या देशातील गडचिरोलीतील धानोरा तालुक्यातील मेंढा(लेखा), चंद्रपूर जिल्हयातील गोडपिंपरी तालुक्यातील पाचगाव, सिंधुदूर्ग जिल्हयातील सांवतवाडी तालुक्यातील चौकुळ अशी काही गावांची प्रातिनिधीक नावे सांगता येतील.

**निष्कर्ष:**

१)महात्मा गांधीजीनी सांगीतलेल्या विश्वस्त संकल्पनेद्वारे देशातील आर्थिक विषमतेची दरी दूर होण्यास मदत होते

२)स्वदेशी या आर्थिक विचारद्वारे देशातील बेकारी, दारिद्रय दूर होण्यास मदत होते.

३)ग्रामस्वराज्य या आर्थिक विचाराद्वारे खेडी स्वावलंबी होतील. आणि शहरीकरणाचे प्रश्न निर्माण होणार नाहीत

४)गांधीजींच्या यंत्राविषयीच्या विचारामुळे देशात रोजगार निर्माण होतील.

५)सर्वोदय या तत्वाद्वारे देशातील सर्व लोकांचा समान प्रमाणात विकास होण्यास मदत होईल.

६)लघु आणि कुटिरोद्योगांना महत्व देण्याच्या गांधीजीच्या विचारामुळे देशाचा समतोल विकास होण्यास मदत होईल.

७)गांधीजींच्या नैतिक, अध्यात्मिक, त्यागवादी आर्थिक विचारामुळे देशात प्रदूषणाचे प्रश्न निर्माण होणार नाहीत

८)महात्मा गांधीजींच्या स्वदेशी या आर्थिक विचाराद्वारे देश आत्मनिर्भर आणि स्वावलंबी होण्यास मदत होते.

**संदर्भग्रंथ:**

१)गांधी उद्यासाठी, दिलीप कुलकर्णी राजहंस प्रकाशन, पुणे
२)महात्मा गांधी विचार संग्रह, महात्मा गांधी, रिया पब्लीकेशन,कोल्हापूर
३)महात्मा गांधींचे विचार , आर. के. राव आणि यू. आर. राव. नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद
४)सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, महात्मा गांधी साकेत प्रकाशन, पुणे
५)वेगळया विकासाचे वाटाडे, दिलीप कुलकर्णी, राजहंस प्रकाशन पुणे
६)गांधी सचित्र जीवनदर्शन , प्रमोद कपूर
७)गांधीजीचे असामान्य नेतृत्व ,पास्कल ॲलन नाझरेथ, राजहंस प्रकाशन, पुणे
८)शोध गांधींचा, चंद्रशेखर धर्माधिकारी, अक्षर प्रकाशन, मुंबई
८)गांधीप्रणित अर्थशास्त्राच्य पलीकडे, देवयानी देशपांडे सेज प्रकाशन, नवी दिल्ली.
९) Economy of Permanence, J. C. Kumarappa ,sarva seva sangh prakashan, Varanashi
10)Economist Gandhi, Jaotirth Rao, Penguin Random House , Gurugram, Hariyana.